# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १९ मार्च, २०१५ / फाल्गुन २८, १९३६ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) जलसंपदा मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

---

**तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेबाबत**

**(१) * ११७४९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव (जि.सांगली) तालुक्यात मागील दोन महिन्यापासून आरफळ, म्हैसाळ व विसापूर- पुणदी या तिन्ही पाणी पुरवठा योजना बंद पडल्या असल्याने त्या तातडीने सुरु कराव्यात अशी मागणी तालुक्यातील विविध पक्षांच्या वतीने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विसापूर - पुणदी पाणी पुरवठा योजना घाईघाईने पूर्ण करण्यात आली असून या योजनेपासून पूर्व भागातील ८ गावे आजही पाण्यापासून वंचित असल्याने सदर गावांना सिध्देवाडी तलावातून स्वतंत्र योजना करून पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील पाणी पुरवठा योजना तातडीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
(२) नाही.
(३) टेंभू प्रकल्पांतर्गत पुणदी व विसापूर योजनांची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार सुरु आहेत.

कृष्णा प्रकल्पांतर्गत आरुळ कालव्यादवारे सन २०१४-२०१५ मधील रब्बी हंगामाचे आवर्तन तासगांव तालुक्यासाठी पूर्ण करण्यात आले.

म्हैसाळ योजनेच्या सिंचनाची पाणीपट्टीची थकबाकी वसूल झाल्यानंतर सद्यःस्थितीत खंडीत झालेला विद्युत पुरवठा सुरु करण्याचे व योजना पुन्हा सुरु करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हा परिषदेतील बंधा-याच्या बांधकाम गैरव्यवहारातील अपचारी अधिका-यांवर कार्यवाही करण्याबाबत**

**(२) * १३६२२ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेतील सन २००६-०७ या वर्षातील बंधा-याच्या बांधकाम गैरव्यवहार प्रकरणामध्ये १४ अधिकारी सामील असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोषी अधिका-यांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,
(२) संबंधीत अधिका-यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हे दाखल केले आहेत. त्यानुसार त्याच्या मार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे वडजी व पांढरद (ता.भडगांव, जि.जळगांव) शिवारातील गुरांना बिबट्याने मारल्याबाबत**

**(३) * १३४१९ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडजी व पांढरद (ता.भडगांव, जि.जळगांव) शिवारात आठ/दहा गुरांवर बिबट्याने हल्ला करून त्यांना ठार मारल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानंतरही दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी महिदंळे येथील शेतातील दोन बैल सदरहू बिबट्याने ठार मारल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली आहे काय, असल्यास, तिचे स्वरूप काय आहे,

(४) अद्यापही नुकसानभरपाई दिली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच सदर बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक २७.१२.२०१४ रोजी वडजी, पांढरद शिवारात एका मेंढीचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन नुकसानग्रस्त शेतक-यास नुकसान भरपाई अदा करण्यात येत आहे.

- बिबट्याच्या बंदोबस्ताच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
- मौ.वडजी व पांढरद या दोन्ही गांवात दवंडी देण्यात आली होती.
- शेतक-यांनी आपली जनावरे शेतात न बांधण्याबाबत तसेच ग्रामस्थांनी एकट्याने परिसरात न फिरण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
- ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात येऊन जनजागृतीसुध्दा करण्यात आली आहे.

-----------------

**पाटण तालुक्यात (जि.सातारा) कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात येणा-या वसुंधरा पाणलोट योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाची कामे करून गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४) * १०१८४ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यात कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या वसुंधरा पाणलोट योजनेतंर्गत करण्यात येत असलेली पाणलोटाची कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत अनेक पाणलोटाची कामे ही प्रत्यक्षात न करता कागदोपत्री केल्याचे दाखवून कृषी विभागातील अधिका-यांनी व मंडळ कृषी अधिका-यांनी या योजनेत कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,

(४) नसल्यास, चौकशीअंती जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमासाठी वितरीत केलेल्या रु. ८००.१९ लक्ष निधीतून रु. ७८०.९७ लक्ष खर्च करुन सलग समतल चर २५२ हेक्टर, मजगी ११९.४६ हेक्टर, लुज बोल्डर २७, अर्दन बांध ०६, वळण बंधारा ०५, आणि माती नाला बांध १०६ ची कामे झालेली आहेत.

(३) नाही.

(४) संबंधीत नाही.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## जळगांव जिल्हापरिषद शाळांतील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी ई- लर्निंगच्या सुविधेसाठी डीपीडीसीने गतवर्षी मंजूर केलेला निधी खर्च न झाल्याबाबत

**(५) * १२३१४ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हापरिषद शाळांतील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी ई-लर्निंगच्या सुविधेसाठी डीपीडीसीने मागील वर्षी मंजूर केलेला रु.७५ लाखांचा निधी अद्यापपावेतो खर्च झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हापरिषदेमार्फत हा उपक्रम राबविण्यासाठी प्राप्त झालेल्या सहा निविदांपैकी चार निविदांमध्ये त्रुटी आढळून आल्याने निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आल्यानंतर सहा-सात महिने होवूनही जिल्हापरिषद प्रशासनाने नव्याने निविदा प्रक्रिया राबविली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने संबंधितावर तसेच उक्त शाळांमध्ये ई-लर्निंगच्या सुविधा त्वरीत सुरु करण्याबाबत  कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

शाळेमध्ये ई- लर्निंगसाठी लागणारे साहित्य खरेदी करणेसाठी महाराष्ट्रातील पुरवठा दारांकडून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यामध्ये प्रथम शासकीय नियमानुसार तीन निविदाधारक नसल्याने तसेच दुस-यांदा निविदा धारकांकडे शासनमान्य सॉप्टवेअर नसल्यामुळे निविदा प्रकिया रद्द करण्यात आली.

त्यानंतर तिस-यांदा दि. २७/१/२०१५ ते दि. १०/२/२०१५ या कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्या असून जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने सदर उपक्रमाच्या पात्र निविदेस दि. २७/२/२०१५ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## चांदुरबाजार (जि.अमरावती) वसुंधरा पाणलोट विकास समितीसाठी केलेल्या खरेदीमधील गैरव्यवहाराबाबत

**(६) * १०५०० श्री.बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुरबाजार तालुक्यात (जि.अमरावती) कृषि अधिका-यांनी वसुंधरा पाणलोट विकास समितीसाठी खरेदी केलेल्या साहित्यासाठी बाजारभावापेक्षा अधिक रक्कम देवून मोठा गैरव्यवहार केल्याची तक्रार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती यांचेकडे दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ व ४ सप्टेंबर, २०१४ रोजी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) चौकशीअंती दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय खरे आहे.

(२) व (३) सविस्तर चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी तालुक्यातील जिल्हापरिषद प्राथमिक शाळा विश्वभारती व अंगणवाडीची इमारत पूर्णतः नादुरुस्त झाल्याबाबत

**(७) * १२९१३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील जिल्हापरिषद प्राथमिक शाळा विश्वभारती व अंगणवाडीची इमारत पूर्णतः नादुरुस्त झाली असून या संबधी लेखी तक्रार पंचायत समिती व जिल्हापरिषद यांच्याकडे केली असता निधी उपलब्ध नाही असे कारण देत सदरची इमारत दुरुस्त केली नाही हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, या शाळेतील शिक्षिका, विद्यार्थी तसेच अंगणवाडी कार्यकर्त्यांच्या जिविताला धोका आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या दुरुस्तीकरिता शासनाने निधी उपलब्ध केला आहे काय, तसेच या शाळेच्या इमारतीची दुरुस्ती शासनाकडून केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

शाळेची इमारत नादुरुस्त असल्याने शाळा व अंगणवाडीसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

(३) सदरच्या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांच्या जागेवर सर्व शिक्षा अभियांनाअंतर्गत दोन नवीन वर्गखोल्या बांधण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे.

-----------------

### खामगांव (जि.बुलडाणा) येथील ग्रामीण भागातील शाळांच्या इमारतींची झालेली दुरवस्था

**(८) * ८५०८ श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या इमारती मोडकळीस आल्यामुळे त्या धोकादायक झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या इमारतीतील विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेवून बसावे लागत असल्यामुळे त्यांचे शिक्षण धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोडकळीस आलेल्या शाळेच्या इमारतींची त्वरीत दुरुस्ती होण्याबाबत शासनाने तातडीची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

खामगांव जिल्हा बुलडाणा येथील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या काही शाळांच्या इमारतीच्या अतिरिक्त असलेल्या वर्ग खोल्या मोडकळीस आल्यामुळे त्या धोकादायक झाल्या आहेत.

(२) नाही.

सदर शाळांतील मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या या अतिरिक्त असून या वर्ग खोल्यांचा वापर विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी केला जात नाही.

(३) मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यांच्या निर्लेखनाबाबत व इमारतींच्या दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

### मालेगांव ( जि.वाशिम) येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याबाबत

**(९) * १२६९७ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव तालुक्यात (जि.वाशिम) महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता तसेच गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार ग्रामसेवक युनियनचे पदाधिका-यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास विभागीय आयुक्तांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्याप कोणताच निर्णय वा चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
तथापि सदर तक्रार ही आयुक्त (नरेगा), नागपूर यांचेकडे करण्यात आली आहे.
(२) सदर प्रकरणी कामाची व दस्तऐवजाची तपासणी केली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणांच्या तपासणीत पुढील बाबी निदर्शनास आल्या.
अ) ६० : ४० च्या अकुशल : कुशल प्रमाणाचा भंग झाला.
ब) कुशलच्या प्रमाणावर नियमापेक्षा जास्त खर्च झाला.
क) कामामध्ये अनियमितता आढळून आली.
या प्रकरणी प्रभारी गट विकास अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी यांना दि. २७/२/२०१५ रोजी निलंबीत करण्यात आले आहे.
तसेच कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (APO) व डाटा ऐन्ट्री ऑपरेटर यांना कंत्राटी सेवेतून दि. २७/२/२०१५ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे.

-----------------

**मुंबई शहराच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाने तयार केलेल्या १०८ कोटीच्या विकास योजनेबाबत**

**(१०) * १३४४२ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाने तयार केलेल्या १०८ कोटीच्या विकास योजनेला मुंबई जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी मंजूरी दिली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीतून कोणकोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत व या योजना किती कालावधीत पूर्ण होणार आहेत,
(३) असल्यास, या सर्व योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मुंबई शहराच्या सर्वांगिण विकासासाठी दि. २ फेब्रुवारी, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मुंबई शहर जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समितीने जिल्हा वार्षिक योजना, सन २०१५-१६ करिता रु. १०८.१७ कोटी रकमेच्या प्रारुप योजना आराखड्यास मान्यता दिली असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे

(रु.लाखात)

| | |
|---|---|
| सर्वसाधारण योजना | ७८१४.०० |
| अनुसूचित जाती उपयोजना | २८६०.०० |
| आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना | १४३.११ |
| एकूण | १०८१७.११ |

(२) व (३) उपरोक्त निधीतून कृषि व संलग्न सेवा, सामाजिक व सामुहिक सेवा, उद्योग व खाण, सामान्य सेवा, सामान्य आर्थिक सेवा इ. विकासक्षेत्रां अंतर्गत मोडणा-या विविध जिल्हास्तरीय योजना राबविण्यात येणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतील योजना दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण होणे अपेक्षीत असुन सदर योजना सन २०१५-१६ मध्ये हाती घेण्यात येणार आहेत.

-----------------

**मौजे जोडमोहा (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथे रोजगार हमीची कामे न करताच ती कागदोपत्री झाल्याचे दाखवून केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(११) * ६७२९ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जोडमोहा (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथे २०१० ते २०१२ या कालावधीत रोजगार हमीची कामे न करताच ती कागदोपत्री झाल्याचे दाखवून केलेल्या गैरव्यवहारा प्रकरणी दोषी अधिका-याविरुध्द विभागीय आयुक्तांना सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तसेच उपवनसंरक्षक, पांढरकवडा यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व त्याबद्दल कोण जबाबदार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२)

अ) मूळ प्रकरणात तहसिलदाराने उपवनसंरक्षक, पांढरकवडा यांनी घेतलेल्या कामाची तपासणी उप अभियंता (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परस्पर करुन घेतली व त्यांच्या अहवालानुसार मजुरांची मजुरी दिली. सदर प्रकरणी विहित कार्यपध्दतीचा अवलंब न केल्यामुळे विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी सुरु करण्यात आली.

चौकशी पथकाने दिनांक २३ जुलै, २०१४ रोजी अहवाल सादर केला.

सदर अहवालामयध्ये या प्रकरणात सकृतदर्शनी कोणताच ठोस पुरावा व दोष दिसत नसल्याने अधिका-यांविरुध्द चौकशी प्रस्तावित केली नाही.

ब) उपवनसंरक्षक यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार कामांची गुणवत्ता तपासणीकरिता दिनांक १०/६/२०१४ रोजी कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (जलसंधारण) विभाग यवतमाळ यांना निर्देश दिले आहेत.

सदर कामाचे कार्यक्षेत्र व व्याप्ती मोठी असल्याने याबाबत दिनांक २०/६/२०१४ रोजी तीन उपविभागीय कार्यालयांना ही तपासणी विभागून देण्यात आली आहे.

या प्रकरणी सर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भात वाघ तस्करांची बहेलिया टोळी सक्रीय झाली असल्याबाबत**

**(१२) * १२७३५ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा- कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा):** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पात वाघांची शिकार करण्यासाठी मध्य प्रदेशातील बहेलिया टोळी सक्रीय झाल्याची माहिती दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान समोर आली असून विशेषतः मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे या टोळीने लक्ष केंद्रीत केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताडोबा, पेंच, नागझिरा, बोरा, टिपश्वर व मेळघाट व्याघ्र प्रकल्पांना या टोळीने लक्ष केले असून वाघांच्या अधिवासाची माहिती घेतली आहे, रामटेक ब-हापूर, उमरेड व नागपूर हे या टोळीचे प्रमुख केंद्र असल्याचे वन विभागाला मिळालेल्या माहितीवरुन स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाघाच्या संरक्षणासाठी शासनाने कोणती कारवाई व उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) वाघांच्या संरक्षणाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.
- जंगलात आवश्यक ठिकाणी संरक्षण व निरीक्षण मनोरे उभारलेले असून, वनकर्मचारी त्यात वास्तव्यास असतात.
- पेंच व ताडोबा व्याघ्र प्रकल्पात विशेष व्याघ्र संरक्षण दल Special Tiger Protection Force (STPF) तैनात केली आहे.
- संरक्षित क्षेत्रात नियमितपणे पायी, वाहनाद्वारे व पावसाळ्यात आवश्यक त्या ठिकाणी माजी सैनिकाद्वारे गस्त करुन शिकारीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे,
- कर्मचा-यांना पिस्तुल, रायफलसारख्या अत्याधुनिक शस्त्रांचा पुरवठा केलेला आहे.
- तसेच एखाद्या घटनेचा जलद गतीने पाठपूरावा करण्यासाठी वाहनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- संरक्षित क्षेत्रात असणा-या संवेदनशील वनक्षेत्रास वारंवार भेटी देण्यात येत आहेत.
- प्रकल्प क्षेत्रात तपासणी नाके असून त्याद्वारे वाहनांची नियमित तपासणी करण्यात येत आहे.
- खब-याला बक्षिस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद केलेली आहे.
- व्याघ्र प्रकल्पाच्या नजीकच्या क्षेत्रालगत बाहेरील काही अनोळखी व्यक्ती इत्यादी आले किंवा कसे याची शहानिशा करण्याकरीता सुरक्षित क्षेत्रालगतचे गावांमध्ये नियमीत भेटी देऊन पोलीस पाटील/सरपंच इत्यादींची भेट घेऊन माहिती प्राप्त करण्यात येते. तसेच आठवडी बाजारात नियमीतपणे गस्त केली जात आहे.
- चंद्रपूर व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यांत आले असून. त्यांचेद्वारे नियमितपणे रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांचे अवयव या बाबींचा शोध घेतला जातो.
- वन्यप्राणी विशेषतः वाघाचे हालचालींचा मागोवा घेण्याकरीता त्याचे जाणे-येण्याचे संभावीत रस्त्यावर, पाणस्थळाजवळ नियमीतपणे कॅमेराट्रॅप लावण्यात आले आहे.

-----------------

## घरातुन पळून मुंबईत आलेल्या वय वर्षे १० ते १६ मधील मुलांच्या पुनर्वसनाबाबत

**(१३) * ८१७५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध कारणामुळे घरातून पळून मुंबईत आलेल्या १० ते १६ वर्षे वयोगटातील मुलांचे प्रमाण प्रचंड वाढले असून १८ ते २१ डिसेंबर, या तीन दिवसात कल्याणसह मुंबईतील रेल्वे स्थानकात पळून आलेली तब्बल २२० मुले सापडली असल्याचे (समतोल फाऊंडेशनच्या) सर्व्हेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यातून तसेच महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यातून मुंबई मध्ये विविध कारणामुळे १० ते १६ वयोगटातील मुले पळून येत असून मुंबईच्या बालसुधारगृहात अशा मुलांना सामावून घेण्याची क्षमता संपली असून केवळ सर्व्हे करुन त्यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम करण्यात येत आहे हे पाहता या पळून आलेल्या मुलांच्या समस्या सोडविण्याकरीता शासन आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या जिल्ह्यांमध्ये ६४ संस्था कार्यरत असून इतर राज्यातून तसेच, महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यातून मुंबईमध्ये पळून आलेल्या मुलांना बाल कल्याण समितीच्या आदेशाने या विभागाच्या संस्थांमध्ये सामावून घेण्याची क्षमता आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे जरंडी ( ता.सोयगांव, जि.औरंगाबाद ) येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचा पाया ढासळल्याबाबत

**(१४) * १२५०९ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जरंडी ( ता.सोयगांव, जि.औरंगाबाद ) येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचा पाया ढासळून भगदाड पडले असून सदरहू शाळेची इमारत ३५ वर्षे जुनी व जीर्ण झालेली असून पावसाने सदरहू शाळेचा पाया ढासळल्याने विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात आले असून संबंधित जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने आवश्यक कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन आवश्यक कार्यवाही केली आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मौजे जरंडी परिसरात डिसेंबर, २०१४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे प्राथमिक शाळेच्या इमारतीपैकी एका शाळा खोलीच्या मागील भिंतीचा पाया अंशतः ढासळला होता.

तथापि, विद्यार्थ्यांसाठी पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध असल्यामुळे सदर खोलीचा वापर शालेय निरुपयोगी साहित्य ठेवण्यासाठी केला जात असल्याने विद्यार्थ्यांना धोका निर्माण झाला नव्हता.
(२) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सोयगाव यांनी आवश्यक पाहणी करुन ढासळलेल्या भागाची तातडीने दुरुस्ती करुन घेतली आहे व सदर इमारत तत्काळ सुस्थितीत आणण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परळी (जि.बीड) येथील महाराष्ट्र मारवाडी फाऊडेंशनच्या शिशुगृहातून ६ बालके गायब असल्याबाबत**

**(१५) * ११७७७ श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.संजय पोतनीस (कालिना) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी (जि.बीड) येथील महाराष्ट्र मारवाडी फाऊडेंशनच्या शिशुगृहातुन ६ बालके गायब असल्याचे दिनांक २० जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिशुगृहाच्या रेकॉर्डवर १९ बालके असताना बालकल्याण समिती व जिल्हा बाल संरक्षण कक्ष अधिकाऱ्यांनी भेट दिली त्यावेळी प्रत्यक्षात पाचच बालके उपस्थित होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शिशुगृहाविरूध्द व संचालकाविरूध्द काय कारवाई करण्यात आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
तथापि, महाराष्ट्र मारवाडी फाऊंडेशन संचालित शिशुगृह, परळी जि.बीड या संस्थेतील ६ बालके संस्थेने बाल कल्याण समितीने दत्तकासाठी मुक्त केलेली नसताना दत्तकेच्छुक पालकांना सांभाळणेसाठी दिलेली होती.
(२) अंशतः खरे आहे.
बाल कल्याण समिती व जिल्हा बाल संरक्षण कक्ष अधिकारी यांनी संस्थेस दि.१७.०१.२०१५ रोजी भेट दिली त्यावेळी बालकांच्या हजेरीपटावर रेकॉर्डनुसार ११ बालकांची नोंद आहे. तथापि, प्रत्यक्षात संस्थेत पाचच बालके उपस्थित होती.
(३) सदर प्रकरणी संस्थेची मान्यता रद्द का करण्यात येऊ नये म्हणून संस्थेस कारणे दाखवा नोटिस बजाविण्यात आलेली आहे.
संस्थेचे सचिव, यांचेविरुध्द पोलिस स्टेशन परळी (शहर) येथे दि.२०.०१.२०१५ रोजी फिर्याद दाखल केली असून भा.दं.वि.कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय बालगृहे व स्वयंसेवी बालगृहे यासाठी २०० कोटीचे अनुदान शासनाकडून प्रलंबित असल्याबाबत

**(१६) * १००९८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय बालगृहे व स्वयंसेवी बालगृहे यासाठी शासनाच्या वतीने देण्यात येणारे सुमारे २०० कोटीचे अनुदान प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व बालगृहांमध्ये खोटी व बोगस आकडेवारी दाखवून शासकीय अनुदानाची उचल केली जाते याबाबत शासनाच्या वतीने स्वतंत्र भरारी पथक नेमून या बालगृहातील वस्तूस्थितीचा अहवाल घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, भरारी पथकाच्या भेटीमध्ये आढळून येणा-या बोगस लाभार्थीबाबत शासन गंभीर दखल घेवून वरील संस्थांच्या संचालक मंडळावर फौजदारी गुन्हा दाखल करुन या संस्थांची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
तथापि, सर्व संस्थांची त्रयस्थ संस्थेकडून (शालेय पट पडताळणी प्रमाणे) पडताळणी मोहिम घेणे इ.मुद्यांबाबत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना सुचना दिल्या असून अहवाल सादर करण्यास कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आंबोडे (ता. सुरगाणा, जि.नाशिक) येथील शाळांच्या क्रिडांगणांसाठी लागणारी जागा शाळांकडे अथवा ग्रामपंचायतींकडे उपलब्ध नसल्याबाबत

**(१७) * १४०२९ श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आंबोडे (ता. सुरगाणा, जि.नाशिक) या ग्रुप ग्राम पंचायतीच्या कार्यकक्षेत सन २००८-०९ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे ५ व ग्रामपंचायतीचे १ अशी ६ क्रिडांगणे ग्राम शिक्षण समितीने विकसीत केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रिडांगणांसाठी लागणारी जागा शाळांकडे अथवा ग्रामपंचायतींकडे उपलब्ध नसतांना ग्रामपंचायतीने त्यांना नमुना नं. ८ चे जागा उपलब्धतेचे दाखले दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर क्रिडांगणांचे काम कोणत्याही मोजमाप पुस्तकात (एम्.बी.) मध्ये न नोंदवीता बिले काढून घेतली आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामाबाबत दिनांक १२ नोव्हेंबर, २०१२ रोजी वा त्या सुमारास सुरगाणा पंचायत समितीच्या सभापती यांनी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे तक्रार करुन सदर कामाच्या चौकशीची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) उपायुक्त (विकास) नाशिक यांनी चौकशी केली असून रक्कम रु. ६,५१,३१२/- व रॉयल्टीसाठी (रु.२५,८२६) इतकी रक्कम वसूल पात्र दाखविली आहे.

ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व सचिव यांचेकडे वसूल करणेबाबतचे आदेश गट विकास अधिकारी पंचायत समिती सुरगाणा यांना पत्र दिनांक १७.११.२०१४ नुसार देण्यात आले आहेत. तसेच सदर शाळेवरील तत्कालीन एकूण ५ मुख्याध्यापक यांना जिल्हा परिषद, नाशिक सेवेतून निलंबीत करण्यात आले असून उर्वरित ४ असे एकूण ९ तत्कालीन मुख्याध्यापक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ (३) चा भंग केल्याने विभागीय चौकशी करणेबाबत दोषारोप बजावले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत आंबोडा, ता.सुरगाणा येथील सरपंच श्री.योगीराज पवार व श्रीमती मिनाक्षी योगीराज पवार ग्रामपंचायत सदस्या यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९(१) नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

श्री.गिरधर सिताराम भरसट, तत्कालीन ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत आंबोडा, ता.सुरगाणा यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांना निलंबित करण्यात आले आहे व त्यांची खाते चौकशी करणेसाठी दोषारोप बजाविण्यात आले आहे.

तत्कालीन उप अभियंता (इवद क्र.२) यांची विभागीय चौकशी करण्यात येत आहे व शाखा अभियंता यांचे निलंबन करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु करणेबाबत त्यांचेवर दोषारोप बजावले आहेत.

-----------------

**राज्यात स्वस्त जेनेरिक औषधांची तीन हजार दुकाने सुरु करण्याबाबत**

**(१८) * ५९१९ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाकडून गरीबांसाठी स्वस्त जेनेरिक औषधांची तीन हजार दुकाने सुरु करण्यात येणार असल्याचे व जेनेरिक औषधांचे दुकान सुरु करणा-या व्यक्तीला अडीच लाख रुपये अनुदान दिले जाणार असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, हाफकीन जीव-अवैध निर्माण महामंडळाने सर्वसामान्य कफ, ताप सिरप, पोटातील कृमीनाशक सिरप,मिल्क प्रोटीन व विटामीन सिरप इत्यादी औषधांचा समावेश असलेल्या जेनेरिक औषधांची विक्री सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दिपक सांवत :** (१) नाही.

(२) होय.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असणा-या सर्व आरोग्य संस्थांमध्ये यापूर्वीच जेनरीक औषधी पुरविली जातात. समाजातील विशिष्ट घटकांना औषधासहीत संपूर्ण रुग्णसेवा मोफत पुरविली जाते.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील मोकळया जागा कोणत्याही संस्था अथवा व्यक्ती यांना कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्यास देवू नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

जनऔषधी योजनेमध्ये शासनाने खाजगी व्यक्ती अथवा सामाजिक संस्था यांना शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत जागा पुरविणे बंधनकारक आहे. योजनेमधील ही अट शासनाच्या प्रचलीत धोरणांशी विसंगत असल्याने ही योजना राज्यात सुरु होवू शकलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(१९) * ९९४६ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) रा.म.मा.९ ते एकोंडी (ज) ते पळसगाव ते नागराळ या रस्त्याची दुरवस्था झालेली असल्याने परिसरातील नागरीकांना गैरसोय होत असून सदर रस्त्यांच्या सुधारणेचे काम तातडीने हाती घेणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) व (३) प्रश्नांकित रस्त्याची पहाणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

रा.म.मा. ९ ते एकोंडी (ज) ते पळसगाव रस्ता हा इजिमा ११५ दर्जाचा असून त्यांची एकूण लांबी १२.६० कि.मी. इतकी आहे. सदर रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे.

सदर लांबीपैकी ०/१०० ते ०/५०० लांबीतील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजना राज्य मार्ग निधी अंतर्गत रु. १०.०० लक्ष किंमतीचे काम मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे. कि.मी. ६/०० ते ६/५०० या भागाचे डांबरी नुतनीकरणाचे काम मार्च २०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले असून उर्वरित लांबी पैकी कि.मी. ०/५०० ते ६/०० व ६/५०० ते १२/६०० या एकूण ११.६०० कि.मी. लांबीची दुरुस्ती आवश्यक आहे. जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधी व निकषाच्या अधिनतेने सदरचे काम प्राधान्य क्रमाने उचित योजनेतून हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील ५० हून अधिक ग्रामपंचायतीमध्ये अद्याप वीज जोडणी नसल्याबाबत

**(२०) * १४३०८ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात पुसद तालुक्यातील ५० हून अधिक ग्रामपंचायतीमध्ये अद्याप वीज जोडणी नसल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुसद तालुक्यात ५० हून अधिक ग्रामपंचायतीमध्ये वीज जोडणीची कामे तात्काळ हाती घेण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात एकूण ११९ ग्रामपंचायती असुन, पैकी ३१ ग्रामपंचायतींमध्ये स्वतःची वीज जोडणी नाही.
(२) होय.
(३) पुसद तालुक्यातील अद्यापपर्यंत स्वतःची वीज जोडणी नसलेल्या ३१ ग्रामपंचायतीपैकी १० ग्रामपंचायतींनी विद्युत जोडणीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे A१ अर्ज सादर केले आहेत.

२० ग्रामपंचायतींना स्वतःची इमारत नसल्यामुळे विद्युत जोडणीबाबत कोटेशन भरण्यात आले नाही. त्यामुळे या ग्रामपंचायतींचे कामकाज सुरळीतपणे चालविण्याकरीता जि.प. शाळा व शेजारील इमारती यांचेकडून तात्पुरती उपाययोजना करुन वीज उपलब्ध करण्यात आली आहे.

गौळमांजरी ही ग्रामपंचायत वनक्षेत्राने वेढलेली असल्यामुळे अद्यापही तेथे विजेचा पुरवठा होऊ शकला नाही. सदर गावात विजेची उपलब्धता होण्यासाठी सौरऊर्जेवर आधारीत विद्युत पुरवठ्याबाबत जिल्हा परिषद प्रयत्नशिल आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**राज्यातील चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयामध्ये गेल्या दोन ते अडीच महिन्यात ४ बिबटे व ३ वाघिणी अशा अ श्रेणीतील ७ जनावरांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२१) * ५२३२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयामध्ये गेल्या दोन ते अडीच महिन्यात ४ बिबटे व ३ वाघिणी अशा  अ श्रेणीतील ७ जनावरांचा मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(२) या सर्व जनावरांचे मृत्यु हे दुचाकी व चारचाकी वाहनांच्या धडकेने झाले आहेत व ते वन्यजीव विभागाच्या दुर्लक्षामुळे झाले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा -  अंधारी व्याघ्र प्रकल्पात मागील दोन ते अडीच महिन्यात दोन वाघिणी व सात बिबट्यांचा तसेच गडचिरोली जिल्हयातील आलापल्ली वनविभागातील चामोर्शी वनपरिक्षेत्रात एका वाघिणीचा अशा अनुसूची १ मधील एकूण १० वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे. तथापि सदर १० वन्यप्राण्यांपैकी २ बिबट्यांचा मृत्यू अज्ञात दुचाकी किंवा चारचाकी वाहनांच्या धडकेने झालेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**केंद्र शासनाने सर्व सामान्य नागरिकांना स्वस्त औषधे मिळावीत म्हणून जन-औषधी योजना सुरु केल्याबाबत**

**(२२) * ८५३१ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त औषधे मिळावीत म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जेनेरिक औषधे देण्याची जन-औषधी योजना सुरु केली असून या योजनेची अंमलबजावणी राज्यात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या योजनेतून ३४८ आजारांवरील औषधे शासकीय रुग्णालयांना मिळणार होती तथापि, राज्य शासनाने योजनेत सहभाग न घेतल्यामुळे योजना राज्यात सुरु होवू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील योजनेत सहभागी न होण्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत व जेनेरीक औषधांच्या उपलब्धतेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दिपक सांवत :** (१) होय.

(२) होय.

तथापि, एकूण 361 विविध औषधांचा समावेश यामध्ये आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असणा-या सर्व आरोग्य संस्थांमध्ये यापूर्वीच जेनरीक औषधी पुरविली जातात. समाजातील विशिष्ट घटकांना औषधासहीत संपूर्ण रुग्णसेवा मोफत पुरविली जाते.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील मोकळ्या जागा कोणत्याही संस्था अथवा व्यक्ती यांना कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्यास देवू नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

जनऔषधी योजनेमध्ये शासनाने खाजगी व्यक्ती अथवा सामाजिक संस्था यांना शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत जागा पुरविणे बंधनकारक आहे. योजनेमधील ही अट शासनाच्या प्रचलीत धोरणांशी विसंगत असल्याने ही योजना राज्यात सुरु होवू शकलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गडचिरोली या नक्षलग्रस्त आदिवासी जिल्ह्यातील अतिदुर्गम सीमावर्ती भागात जनतेस चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२३) * १०२४६ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली या नक्षलग्रस्त आदिवासी जिल्ह्यात शासकीय सेवेचे अधिकारी येऊन सेवा बजावत नसल्याने छत्तीसगड मधील प्रयोगशाळा तंत्रज्ञांचा वैद्यकीय व्यवसाय जिल्ह्याच्या एटापल्ली, भामरागड, कोरची, सिरोंचा या तालुक्यातील सीमावर्ती भागात वाढत चालल्यामुळे एकप्रकारे दुर्गम व अतिदुर्गम भागातील रुग्णाच्या जीवाशी खेळ सुरु असल्याचे चित्र आहे व शासनाचा आरोग्य विभाग याप्रकाराबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागात शासकीय आरोग्य सेवेशिवाय पर्यायी आरोग्य सेवा नाही तसेच शासनाच्या आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिका-याची अनेक पदे रिक्त असल्याने कर्मचा-यांची कमतरता यामुळे आणि काही भागातील लोक आरोग्य केंद्रापर्यंत दळणवळणाची साधने नसल्याने पोहोचत नाही अशा परिस्थितीत छत्तीसगड राज्यात प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदावर असलेले अनेक दुर्गम गावामध्ये अवैधपणे वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत परिणामतः अनेक लोकांचे चुकीच्या उपचारामुळे जीवही जाण्याच्या घटना घडलेल्या आहेत, घडत आहेत, हे खरे आहे काय

(३) असल्यास, गडचिरोली या नक्षलग्रस्त आदिवासी जिल्ह्यातील एटापल्ली, भामरागड, कोरची, सिरोंचा या अतिदुर्गम सीमावर्ती भागातील जनतेस चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच बोगस डॉक्टरांकडून रुग्णांची होणारी फसवणूक कायमस्वरुपी बंद होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) छत्तीसगड राज्यातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ गडचिरोली जिल्ह्यात अवैधपणे वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही. मात्र सदर प्रकरणी तपासणी करण्याचे निदेश संचालक आरोग्य सेवा यांना देण्यात आले आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली, भामरागड, कोरची, सिरोंचा या तालुक्यामध्ये ३० खाटांचे प्रत्येकी एक रुग्णालय, १३ प्राथमिक आरोग्य पथके कार्यरत आहेत. सदर ठिकाणी वैद्यकीय अधिकारी गट अ संवर्गातील एकूण ३६ पदे मंजूर असून त्यापैकी २५ स्थायी, ८ बंधपत्रित व २ अस्थायी वैद्यकीय अधिका-यांची पदे भरलेली आहेत. तसेच वर्ग ३ ची ८ पदे व वर्ग ४ ची ११ पदे रिक्त असून सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

गडचिरोली जिल्ह्यात प्रयोगशाळा तंत्रज्ञ (जिल्हा परिषद स्तर) ४५ पदे मंजूर असून सदर पदे भरलेली आहेत. तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ (राज्यस्तर) ३ पदे मंजूर असून २ पदे भरलेली आहेत व १ पद रिक्त आहे. सदर रिक्त पद भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

### देवी देहगाव (ता.घनसांगवी, जि.जालना) येथील शेतक-यांच्या जमिनी पाझर तलावासाठी दाखवून पाझर तलाव न करताच अधिकारी व कंत्राटदाराने लाखो रुपयांची बिले घेतल्याबाबत

**(२४) * ११५४८ श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवी देहगाव (ता.घनसांगवी, जि.जालना) येथील शेतक-यांच्या जमिनी पाझर तलावासाठी दाखवून पाझर तलाव न करताच अधिकारी व कंत्राटदाराने लाखो रुपयांची बिले घेतल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अधिकारी व कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
तथापि, याबाबतची तक्रार सन २०१३ मधील आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी पाझर तलावाच्या मंजूर जागेवर खोदकाम झालेला खड्डा आढळून आला. या खड्ड्याव्यतिरिक्त पाझर तलावाचे इतर कोणतेही काम आढळून आलेले नाही.

या प्रकरणी संबंधित शाखा अभियंता व कंत्राटदार यांच्याविरुध्द भा.द.वि. कलम २०४, ३४ अन्वये दि.२९.११.२०१३ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणी संबंधित शाखा अभियंता यांना दि.१०.०३.२०१५ रोजी निलंबित केले आहे. तसेच संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## जायकवाडी धरणातून गोदावरी नदी पात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडण्याच्या मागणीबाबत

**(२५) * ११०५८ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणातून गोदावरी नदी पात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडण्याची मागणी शेतकरी, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीसाठी शेतकरी व ग्रामस्थ यांनी आंदोलनाची भूमिका घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोदाकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये म्हणून शासन नदीपात्रातील बॅरेज पाणी सोडण्यासाठी कोणती कार्यवाही करीत आहे वा करण्यात येत आहे,
(४) तसेच,धरणातून पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणी आवश्यक असल्यामुळे पाणी पट्टी अथवा शुल्क आकारणी न करण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पाणी आरक्षण आदेशित केल्यानुसार आपेगांव व हिरडपुरी या बॅरेजमध्ये पैठण धरणातून दिनांक ०७-११-२०१४ ते ०९-११-२०१४ या कालावधीत १५ दलघमी इतके पाणी सोडण्यात आले आहे.

(४) शासनाच्या प्रचलित नियमानुसार पाणीपट्टी आकारणी केली जाते. पाणीपट्टी अथवा शुल्क आकारणी न करणे, ही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**मुंबई, मराठवाडा आणि कोकणात कोयनेचे अवजल वळविण्याबाबत**

**(२६) * ९००६ श्री.संजय कदम (दापोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, मराठवाडा आणि कोकणात कोयनेचे अवजल वळविण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे पाटपन्हाळे (कोंडवाडी) येथील जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(२७) * १२६२३ श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाटपन्हाळे (कोंडवाडी) (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील पाटपन्हाळे साळवी स्टॉप ते गणेश मंदिर पाटपन्हाळे हा रस्ता पूर्णपणे नादुरुस्त झाला असून पूर्ण रस्त्यामध्ये मोठमोठे खडे पडले असून वाहतुकीस अयोग्य झाल्यामुळे सदर रस्त्याचा दुरुस्ती प्रस्ताव ग्रामपंचायत पाटपन्हाळे यांच्यामार्फत जिल्हा परिषद पंचायत समिती, गुहागर यांच्याकडे जा.क्र. ११० दिनांक ५ ऑगस्ट, २०१४ व जा.क्र. ११५ दिनांक ७ ऑगस्ट, २०१४ रोजी पाठविण्यात आला असूनही अद्याप सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतीने पाठविलेल्या उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास त्यात काय आढळून आले व सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने किती निधी मंजूर केला आहे व किती कालावधीत रस्ता दुरुस्तीचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ग्रामपंचायत पाटपन्हाळे यांचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.
(२) उपअभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग, गुहागर यांनी सदर रस्त्यांची पहाणी केली आहे.
(३) विषयांकित प्रश्नामध्ये पाटपन्हाळे वाकी पिंपळवट (ग्रा.मा.१२) व पाटपन्हाळे गणेशवाडी कोंडवाडी (ग्रा.मा.३९) या दोन रस्त्यांचा समावेश आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावरुन बारमाही वाहतूक सुरु आहे. तथापि सदर रस्त्यांच्या नादुरुस्त लांबीमधील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधी व निकषाच्या अधिनतेने व प्राधान्य क्रमाने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील पंचायत समितीमार्फत विशेष घटक योजनेअंतर्गत एचडीपीई पाईप खरेदीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२८) * १३६७४ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील पंचायत समितीमार्फत विशेष घटक योजनेअंतर्गत (२०१२-१३) एचडीपीई पाईप खरेदीमध्ये २५ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याचा अहवाल गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेने दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रयोगशाळेच्या अहवालानुसार सदर पाईप गुणवत्तेने चांगले दर्जाचे असून, दर्जाबाबत एकही तक्रार प्राप्त नाही, त्यामुळे हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातून पश्चिमे कडील नद्यांचे पाणी समुद्रात वाहुन जात असल्याबाबत**

**(२९) * १२८०० श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातून पश्चिमे कडील नद्यांचे पाणी पावसाळ्यात समुद्रात वाहुन जात असल्यामुळे पिण्याचे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जात असल्याने सदर नदीचे प्रवाह मुळा प्रकल्प व गोदावरी नदीकडे वळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावास पुर्णता आणण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना व कार्यवाही करण्यात आली वा येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) पश्चिम वाहिनी नद्यांचे अरबी समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी गोदावरी खो-यात वळविण्यासाठीच्या १७ प्रवाही वळण योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असून ५ प्रवाही वळण योजनेची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत. १२ प्रवाही वळण योजनांची कामे प्रगतीत आहेत. या व्यतिरिक्त पार खो-यातील पाणी गोदावरी खो-यात वळविणेसाठी संकल्पीत केलेल्या उपसा जोड योजना ३ व ४ चे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असलदे येथे ६५ लाख रुपये खर्च करुन बांधलेल्या**
**सिमेंट नाला बंधा-यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३०) * ८००० श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असलदे येथे ६५ लाख रुपये खर्च करुन बांधलेल्या सिमेंट नाला बंधा-यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असून बंधा-यांना गळती लागली असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधा-यांची पाहणी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार बंधा-यांची निकृष्ट दर्जाची कामे करणा-या दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील चौदा वनवृत्तांमध्ये सन २०१४ मध्ये जवळपास**
**३० हजार ३६२ वृक्षांची वनमाफीयांनी तोड केल्याबाबत**

**(३१) * ५४७२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चौदा वनवृत्तांमध्ये सन २०१४ मध्ये जवळपास ३० हजार ३६२ वृक्षांची तोड वनमाफीयांनी केलेली असून पाच कोटीच्या सागवानाची चोरी केली आहे तसेच वनअधिका-यांच्या संगनमताने वनमाफीयांनी सन २०११ या वर्षात १० कोटी ६२ लाख २३ हजार, सन २०१२ या वर्षात ८ कोटी १४ लाख ८४ हजार, सन २०१३ या वर्षात ७ कोटी ८६ लाख ५५ हजार आणि सन २०१४ या वर्षात २ कोटी ६४ लाख २३ हजार अशाप्रकारे २८ कोटी ६४ लाख २६ हजार रुपयांचे नुकसान वनविभागाचे झाले असून चंद्रपूर वनवृत्तात १० कोटी ३१ हजार रुपयांच्या वृक्षांची चोरी झालेली असल्याची माहिती दिनांक १० जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत कोणकोणत्या वनअधिकारी आणि वनमाफीयावर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :**

(१) राज्यभरातील चौदा वनवृत्तांमध्ये जानेवारी ते मार्च, २०१४ या कालावधीत सुमारे ३० हजार ३६२ वृक्षांची अवैध तोड निदर्शनास आली आहे.

जानेवारी ते मार्च २०१४ च्या त्रैमासिकामध्ये सागवानाची चोरी पाच कोटी झालेली नसून साग अवैध वृक्षतोड संख्या ११६५९ आहे. त्याचे बाजार मुल्य रु. १.४७ कोटी असून जागेवर १.२३ कोटीचा माल जप्त केला आहे.

राज्यामध्ये एकूण अवैध वृक्षतोड सन २०११,२०१२ व २०१३ मध्ये झालेली वृक्षतोडीची प्रश्नातील नमूद आकडेवारी बरोबर आहे.

सन २०१४ मध्ये चंद्रपूर वनवृत्तांत रु. १०.३१ कोटीचे वृक्षतोड झालेली नसुन ती रु. २६.६४ लाख ऐवढी आहे.

तसेच १० जानेवारी, २०१५ मध्ये व त्या दरम्यान १० कोटी ३१ हजार रुपयांच्या वृक्षांची चोरी निदर्शनास आली नाही.

(२) व (३) गडचिरोली वनवृत्तातील सिरोंचा वनविभागातील वनकर्मचारी व वनतस्करांने संगनमताने अवैध वृक्षतोड केल्याबाबत एका प्रकरणी वनरक्षक दोषी आढळून आल्याने दिनांक १५.९.२०१४ रोजी निलंबीत करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच वनतस्कर यांचेवर दिनांक ३.८.२०१४ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात येऊन दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) कार्यवाही केली असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील वन विभागाच्या वनीकरण लागवड प्रकल्पामध्ये लक्षावधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(३२) * ७०५७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वन विभागाच्या वनीकरण लागवड प्रकल्पामध्ये लक्षावधी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असून आदिवासी विद्यार्थी व मजुरांची फसवणूक केल्याप्रकरणी येथील माजी सरपंचाने दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच वनविभागामध्ये संगनमताने सुरु असलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई करण्यासंदर्भात सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशतः खरे आहे.

(२) प्राप्त तक्रारीबाबत केलेल्या चौकशीत गैरव्यवहार झाला नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथील सुपरस्पेशालिटी रुग्णालयात डॉक्टरांची २४ पदे रिक्त असल्याबाबत**

**(३३) * ५५२४ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सुपरस्पेशालिटी रुग्णालयात सध्या डॉक्टरांची २४ पदे रिक्त असल्यामुळे न्युरोप्लास्टिक सर्जरी, मूत्रपिंड पुनर्रोपन आदी सर्जरी बंद असल्यामुळे रुग्णांचे हाल होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांची असलेली रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात गट- अ, वर्ग -१ ची १२ पदे मंजूर असून त्यापैकी ५ पदे भरलेली आहेत. तसेच सदर रुग्णालयात गट-अ, वर्ग-२ ची ३३ पदे मंजूर असून त्यापैकी ३० पदे भरलेली आहेत. सदर उपलब्ध तज्ञांमार्फत तसेच मानसेवी अतिविशिष्ट तज्ञांमार्फत रुग्णांवर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात येत आहेत.

(२) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील अति विशिष्ट तज्ञांची पदे भरण्याकरिता आवश्यक असलेले सेवा प्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर सेवा प्रवेश नियमास मंजूरी मिळाल्यानंतर तज्ञांची पदे पदोन्नतीने तसेच नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर शहराला लागून वाहणा-या इरई नदीच्या काठावर**
**पूर संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(३४) * १३४९३ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहराला लागून वाहणा-या इरई नदीच्या काठावर पूर संरक्षण भिंत बांधण्यासाठी विशेष बाब म्हणून रु. २५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आय.आय.टी.पवई मुंबई या संस्थेने दिनांक २८ व २९ जून, २०१४ ला चंद्रपूर शहरातील पूरप्रवण भागाचे सर्वेक्षण करुन पूरनियंत्रण उपाययोजना करण्याबाबतचा अहवाल माहे जुलै, २०१४ मध्ये कार्यकारी अभियंता चंद्रपूर पाटबंधारे विभाग चंद्रपूर ला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाची प्रत कार्यकारी अभियंता चंद्रपूर पाटबंधारे विभाग चंद्रपूर यांनी मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिनांक १४ जुलै, २०१४ रोजी वा त्यादरम्यान जा.क्र. ४०३२/प्रशा-३/ पूर नियंत्रण /२०१४ अन्वये उक्त संस्थेचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आय.आय.टी. पवई या संस्थेच्या अहवालाप्रमाणे कोणतीही उपाययोजना अद्यापही करण्यात आली नसल्यामुळे येणा-या मान्सून सत्रात पुन्हा माहे जुलै- ऑगस्ट २०१३ मध्ये उद्भवलेली पूर परिस्थती निर्माण होवू शकते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आय.आय.टी. पवई मुंबई या नामांकित संस्थेने सुचविलेल्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दि.११.१२.२०१४ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) आय.आय.टी. पवई, मुंबई यांनी केलेल्या अभ्यासाचा प्राथमिक अहवाल क्षेत्रिय कार्यालयास दिला असुन अंतिम अहवाल दिलेला नाही.

(३) आय.आय.टी. पवई, मुंबई यांनी दिलेल्या प्राथमिक अहवालात पूरासाठी नदीलगतचे निळ्या व लाल झोन मधील अवैध बांधकामे, वे.को.ली.च्या कोळसा खाणींचे ढिगारे, रेतीचा उपसा तथा वर्धा, वैनगंगा नदी पावसाळ्यात पूर्ण भरली असताना इरई धरणातून सोडण्यात येणारे अतिरिक्त पाणी इ.बाबी कारणीभूत असल्याचे नमूद केले आहे. मात्र यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोनातून हायड्रॉलॉजीकल अभ्यास करणे आवश्यक असून त्या करिता आवश्यक परिपूर्ण डेटा व निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर अंतिम अहवाल देण्याकरीता अजून काही कालावधी आय.आय.टी. पवई या संस्थेस लागणार आहे. सदर हायड्रॉलॉजीकल अभ्यासाकरिता आय.आय.टी. पवई, मुंबई यांनी रु. २५.५० लक्षची मागणी केली असुन त्यापैकी रु. १३.५० लक्ष त्यांना देण्यात आले आहे. उर्वरीत रु. १२.०० लक्ष निधीकरीता जिल्हा प्रशासनाकडे दि. १७.०४.२०१४ च्या पत्रान्वये मागणी केली आहे.

(४), (५) व (६) सद्यःस्थितीत आय.आय.टी. पवई, मुंबई या संस्थेने प्राथमिक अहवालात इरई नदीतील गाळ काढणे, निळ्या व लाल पूररेषेमधील अवैध बांधकाम काढणे व वे.को.ली.च्या कोळसा खाणीचे ढिगारे काढणे अशा उपाययोजना सुचविल्या असून त्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे, त्यामुळे शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जालन्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी मुंबईच्या सिध्दिविनायक ट्रस्टने आठ कोटी रुपये दोन वर्षापूर्वी दिले असूनही शिरपूर पध्दतीच्या बंधा-यांची प्रक्रिया केवळ कागदोपत्रीच सुरु असल्याबाबत**

**(३५) * ११३०६ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालन्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी मुंबईच्या सिध्दिविनायक ट्रस्टने आठ कोटी रुपये दोन वर्षापूर्वीच दिले असून देखील शिरपूर पध्दतीच्या बंधा-यांची प्रक्रिया केवळ कागदोपत्रीच सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिरपूर बंधा-याचे आठ कोटी रुपये पडून असण्यामागच्या कारणाची शासनाने सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे दि.२० मे, २०१३ रोजी रु.८.०० कोटी निधी वर्ग करण्यात आलेला आहे.

रु.८.०० कोटी निधीतुन ८ बांधा-यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या कामापैकी ६ कामांना तांत्रिक मान्यता दिली असून निविदा प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. सदरील कामे एप्रिल- २०१५ मध्ये सुरु करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जालना जिल्हयातील लघु पाटबंधारे विभागातील उपविभागीय अभियंता यांनी अपहार केल्याबाबत**

**(३६) * ७८०० श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील लघु पाटबंधारे विभागातील उपविभागीय अभियंता यांनी सन १९९५ ते माहे मे २०१४ या काळात जाफ्राबाद तालुक्यात पाझर तलाव क्रमांक ८ केल्याची बनावट कागदपत्रे दाखवुन ९ लाख ६५ हजारांचा अपहार केल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अपहार प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार यात दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) सदर कामाची लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांच्यामार्फत चौकशी/ तपासणीचे काम सुरु आहे.

(३) संबंधित अभियंत्यांवर पोलिस स्टेशन टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि. जालना येथे गुन्हा नोंद केलेला आहे. त्याअनुषंगाने संबंधित अभियंत्यास अटक करण्यात येवून, त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या २७४६ शाळांतील ८१३ वर्ग खोल्यांच्या भिंतीला तडे गेल्याबाबत**

**(३७) * १०३०९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या २७४६ शाळांतील ८१३ वर्ग खोल्यांच्या भिंतीला तडे गेल्याने मोडकळीस आलेल्या असून विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून शिक्षण घ्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्धतेअभावी दुरुस्तीची कामे प्रलंबित असून त्याकरीता शिक्षण विभागाने रु.३ कोटी निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर वर्ग खोल्यांची त्वरीत दुरूस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर शाळांची दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार करणेत येत आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत गट शिक्षणाधिकारी यांचे मार्फत सदर शाळांची पाहणी करण्यात आली असून तातडीच्या दुरुस्ती आवश्यक वर्गखोल्यांची दुरुस्ती करणेत आली आहे. उर्वरित वर्गखोल्यांची दुरुस्ती प्राधान्य क्रमाने करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या घरकुल योजनेबाबत

**(३८) * ८२९६ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात केंद्र शासनाच्या घरकुल योजनेतून १८००० लोकांना घरकुल मंजूर करण्यात आली असून या लोकांकडे स्वतःची जागा नसल्याने घरकुलांची कामे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यात बेघरांना घर बांधण्यासाठी जागा किंवा रु.५० हजार अनुदान देण्याची मागणी जिल्हा दक्षता समितीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार बेघरांना शासकीय गायरान जागा देणेबाबत वा विकत घेणेसाठी शासनामार्फत अनुदान देणेबाबत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

दारिद्रय रेषेखालील बेघर प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा असल्याशिवाय घरकुलास मंजूरी दिली जात नाही. सद्या पुणे जिल्ह्यातील प्रतिक्षा यादीमध्ये १८,२६३ लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकामासाठी स्वतःची जागा नसल्यामुळे त्यांना अद्याप मंजूरी देता आली नाही.

(२) हे खरे नाही.

सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सावर्जनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास गायरान/गुरचरण जमीनीचा वापर करावा, असे निदेश दिले आहेत. परंतु घरकुल योजना वैयक्तिक लाभाची योजना असल्यामुळे गायरान/गुरचरण जमीन उपलब्ध करुन देता येत नाही. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी स्वतःची जागा घेण्यासाठी केंद्र व राज्य (५० : ५० हिस्सा) असे रु. २०,००० /- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पातूर (जि.अकोला) पंचायत समितीमध्ये १०० टक्के अनुदानावर लोखंडी टीनपत्रे या योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

**(३९) * १३२०२ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातूर पंचायत समितीमध्ये (जि.अकोला) जिल्हा परिषद समाज कल्याण अंतर्गत १०० टक्के अनुदानावर लोखंडी टीनपत्रे या योजनेतील मागासवर्गीय लाभार्थ्यांच्या वाट्याचे लोखंडी टीनपत्रे वाटप करताना विस्तार अधिकारी पजई व सहकारी कर्मचारी यांनी मोठा गैरव्यवहार केला असल्याची तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहारची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदरहू प्रकरणी दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अशा आशयाची तक्रार गटविकास अधिकारी, पातूर यांना प्राप्त झाली आहे.

(२) व (३) प्रस्तूत प्रकरणी चौकशी अंती ५ लाभार्थ्यांना दुबार टिनपत्राचे वाटप करण्यात आले असल्याचे व इ.मा.व. प्रवर्गातील एका लाभार्थ्यास योजनेच्या अटी व शर्ती नुसार लाभार्थीचे कागदपत्राची तपासणी न करता नियमबाह्यरित्या टिनपत्रे वाटप केल्याचे निदर्शनास आले आहे.

संबंधित विस्तार अधिकारी, यांनी नियमबाह्य ३० नग टिनपत्र्याचे जादा वाटप केल्याप्रकरणी खाते निहाय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्हा परिषद लघु सिंचन विभागाच्यावतीने सात तलावाचे काम पूर्ण झाले असून त्यात पाणी साचत नसल्याचे आढळून येत असल्याबाबत**

**(४०) * ५६३४ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषद लघु सिंचन विभागाच्यावतीने सन २०१२-१३ आणि सन २०१३-१४ या दोन वर्षात ११ तलावांचे काम हाती घेण्यात आले असून या तलावांपैकी सात तलावाचे काम पूर्ण झाले असून त्यात पाण्याचा थेंबही साचत नसल्याचे आढळून येत आहे तसेच ताकतोड येथील दोन तलाव अपूर्णावस्थेतच असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली असल्यास तलावांचे काम तातडीने पूर्ण करुन पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(३) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागामार्फत सन २०१२-१३ मध्ये ११ तलावांचे कामांना मंजूरी देण्यात आली होती. सन २०१३-१४ मध्ये एकाही तलावाचे काम मंजूर नव्हते. सदरचे ११ तलावांपैकी ७ तलावांमध्ये पाणी साठले होते. तसेच उपरोक्त तलावांपैकी ६ तलावांची कामे पूर्ण झाली असून, उर्वरित ५ कामे प्रगतीपथावर आहेत.

सेनगाव तालुक्यातील ताकतोडा पाझर तलाव क्र.१ चे काम पूर्ण झाले असून त्यात पाणी साठले होते. पाझर तलाव ताकतोडा क्र. २ चे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**मौजे नेचल (ता.पाटण, जि.सातारा) येथे कृषी विभागाच्या वतीने राबविलेल्या मेगा पाणलोट उपक्रमात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(४१) * १०१८५ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेचल (ता.पाटण, जि.सातारा) येथे कृषी विभागाच्या वतीने सन २००९-१० मध्ये मेगा पाणलोट प्रेरक प्रवेश उपक्रम राबविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उपक्रमांतर्गत या गावांमध्ये कोयनामाई पाणलोट समिती स्थापन करून माती नाला बंडीगसारखी कामे करण्यात आली असून सदरची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली असून या कामांमध्ये कृषी विभागाच्या अधिका-यांनी कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे नेचल गावाचे उप सरपंच व पाणलोट समितीचे सदस्य श्री.रामचंद्र शंकर मोहिते यांनी नेचल गावाच्यावतीने या कामांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करूनही याची चौकशी होत नसल्याने जिल्हा कृषी अधिकारी यांना दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास बेमुदत उपोषण करीत असल्याबाबत पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती उक्त अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे. या उपक्रमांतर्गत अभ्यासिका ०१, व्यायामशाळा ०१, कृषि वाचनालय ०१, नॅपसॅक स्प्रेयर ०२, एच टी पी स्प्रेयर ०२, एच टी पी स्प्रे गन व पाईप ०२, इत्यादी साहित्य खरेदी केले आहे.

(२), (३) व (४) माती नाला बांधाची २ कामे प्रेरक प्रवेश उपक्रमातून न करता पाणलोट विकास घटकाखाली कोयनामाई पाणलोट समितीने कृषि विभागाच्या तांत्रीक मार्गदर्शनाने केली आहेत. तक्रारीच्या अनुषंगाने उप प्रकल्प व्यवस्थापक पाटण यांनी दिनांक ०९ सप्टेंबर, २०१४ रोजी सरपंच, पाणलोट समिती अध्यक्ष आणि लाभार्थी यांच्यासमवेत चौकशी करण्यात आली असून चौकशीत अनियमीतता झाली नसल्याचे दिसून आले. उपप्रकल्प व्यवस्थापक यांनी कामाची प्रत्यक्ष पहाणी केली असून कामे सुस्थीत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) संबंधीत नाही.

-----------------

**बांदा तालुक्यातील (जि. सिंधुदुर्ग) तेरेखोल नदी पात्रात मगरीच्या संख्येत वाढ झाल्याबाबत**

**(४२) * १४१५६ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदा तालुक्यातील (जि. सिंधुदुर्ग) इन्सुली धुरीवाडा, मडुरा, रोणापाल, सातोसे व बांदा या गावाच्या तेरेखोल नदी पात्रात मगरीची संख्या मोठया प्रमाणात वाढल्याने उसा गावातील लोकांना त्यामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मगरीचा बंदोबस्त करण्याबाबत गावक-यांनी उपवन संरक्षकाच्या निदर्शनास ही बाब वांरवार आणून देखील त्याकडे संबंधितांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन काय कारवाई केली आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात इन्सुली धुरीवाडा, मडूरा, रोणापाल, सातोसे व बांदा गावालगत तेरेखोल नदीपात्रात मगरींचे वास्तव्य आहे हे खरे आहे. त्यामुळे गावातील लोकांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांना वेळोवेळी वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक प्रत्यक्ष भेटून मगरीपासून स्वतःचे व पाळीव प्राण्यांचे संरक्षण करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच मगर नैसर्गिक अधिवासातून लोकवस्तीकडे येणार नाही याबाबत दक्षता घेण्याबाबत क्षेत्रिय कर्मचा-यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**चंद्रपूर जिल्हयातील सावली येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये तीन वैद्यकिय अधिका-यासह अनेक कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४३) * ५४७५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले असून या ग्रामीण रुग्णालयामध्ये तीन वैद्यकिय अधिका-यासह अनेक कर्मचा-यांची पदे रिक्त असल्यामुळे औषधोपचारापासून रुग्णांना वंचित राहावे लागत असून गंभीर आजार असलेल्या रुग्णांना खाजगी रुग्णालयासह ५८ किमी दूर चंद्रपूर किंवा १६५ किमी दूर नागपूर येथे औषधोपचाराकरीता जावे लागत असल्यामुळे रुग्णांसह रुग्णांच्या नातेवाईकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. याकारणास्तव नागरिकांची अडचण लक्षात घेता याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य, प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य, संचालक सार्वजनिक आरोग्य यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावली येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांना दि. ०५.०१.२०१५ रोजी निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे.

तथापि, ग्रामीण रुग्णालय सावली, जि. चंद्रपूर येथे एकूण २५ पदे मंजूर असून त्यापैकी १७ पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ ची ३ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत. त्यापैकी १ वैद्यकीय अधिकारी सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रतिनियुक्तीवर आहेत

उपलब्ध अधिकारी व कर्मचा-यांमार्फत रुग्णांना आवश्यक त्या रुग्ण सुविधा वेळीच पुरविण्यात येतात.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ-वर्ग-१ संवर्गाची रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच कर्मचा-यांची रिक्त पदे विहित पध्दतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात होत असलेली जगंलतोड व वन्यजीव तसेच हिंस्त्र प्राण्यांनी मागील एक-दोन महिन्यात ९ हून अधिक नागरीकांचा बळी घेण्यात आल्याचा प्रकार**

**(४४) * ५५३१ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात होत असलेली जंगलतोड व वन्यजीव तसेच हिंस्त्र प्राण्यांनी मागील एक-दोन महिन्यात ९ हून अधिक नागरीकांचा बळी घेण्यात आल्याचा प्रकार माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्य प्राण्यापासून नागरीकांचे होत असलेले मृत्यू रोखण्याबाबत तसेच अवैध होत असलेली वृक्षतोड रोखण्याबाबत वृक्षतोड करणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सन २०१४ तसेच त्यानंतर जानेवारी, २०१५ मध्ये नाशिक जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्याचा मृत्यू झाल्याची एकही घटना निदर्शनास आलेली नाही. तथापि सन २०१४ या वर्षात १२८९ वृक्षांची अवैधतोड झाली असून रु. ३७,७५४९२/- इतके नुकसान झाले आहे.
(२) मानव वन्यप्राणी संघर्ष टाळणेसाठी प्रामुख्याने बिबट प्रवण क्षेत्रातील गावांत वन अधिकारी/ क्षेत्रीय कर्मचारी यांचेमार्फत जनजागृती करुन गावांमध्ये सार्वजनिक ठिकाणी पोस्टर लावण्यात आलेले आहेत. सदर पोस्टरमध्ये बिबट प्रवण क्षेत्रात सावधानतेने कसे वागावे, बिबट्याचे खाद्य, बिबट्याचे जीवशास्त्र व गावाजवळ बिबट्याचा वावर कमी करण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच जिवीत हानी होऊ नये याबाबत मार्गदर्शन केले जाते.

अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी क्षेत्रिय तसेच फिरते पथकाचे अधिकारी व कर्मचारी नियमित जंगल गस्त करुन वनसंवर्धन तसेच वन व वन्यजीव संरक्षण काम करतात. तसेच गुजराथ, दादरा नगर हवेली या राज्य /केंद्रशासित प्रदेशाच्या अधिका-यांसोबत आतंरराज्यीय बैठका घेऊन वनसंरक्षणार्थ उपाययोजना केल्या जातात. शासकीय वनांच्या व्यवस्थापनासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीनच्या दुरूस्तीबाबत**

**(४५) * १३५०५ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीनच्या दुरूस्तीवर तब्बल ४७ लक्ष ८६ हजार ७३७ रूपये खर्च झाल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१५ च्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकी दरम्यान जिल्हा शल्य चिकित्सक यांनी माहिती सादर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिटी स्कॅन मशीन मागील दोन वर्षा पासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले आहे व त्यानुषंगाने जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे नविन सिटी स्कॅन मशीन खरेदी करण्यासंदर्भात व आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कार्मच्या-याची रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथे पी.पी.पी. तत्वावर सि.टी. स्कॅन सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कंपनीशी करार करण्यात आलेला असून लवकरात लवकर मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

पर्यायी व्यवस्था म्हणून खाजगी सि.टी. स्कॅन केंद्राकडून अत्यावश्यक रुग्णांना व बी.पी.एल. धारक रुग्णांना मोफत सि.टी. स्कॅनची सुविधा पुरविण्यात येत आहे.

जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथील वैद्यकीय अधिकारी, गट-अ (वर्ग -१) च्या मंजूर २० पदांपैकी ७ पदे भरलेली असून वैद्यकीय अधिकारी, गट-अ च्या ३५ मंजूर पदांपैकी ३२ पदे भरलेली आहेत.

रिक्त पदे नामनिर्देशनाने तसेच पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच बंधपत्रित उमेदवारांना अस्थायी देण्याबाबतही कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाटण (जि.सातारा) तालुक्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर व इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये वृक्षांची तोड करण्यात आली असल्याबाबत**

**(४६) * १०२०५ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये केमसे (ता.पाटण) येथे ६७६ वृक्षांची वृक्षतोड झाली असून ३०० झुडपांची तोड करण्यात आली असून केवळ ९४ वृक्षांची तोड झाल्याचा वनविभागाने गुन्हा नोंद केला आहे,

(२) तसेच पाटण तालुक्यात रासाठी या इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये वन विभागाच्या पुढाकाराखाली बेकायदा वृक्षतोड झाली असून सुमारे १०० हुन अधिक झाडे तोडणा-या वनविभागाने प्रत्यक्षात मात्र ३५ वृक्षांची तोड केल्याची नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मनाई जातींच्या झाडांची बेसुमार तोड केल्याप्रकरणी पाटणच्या वनक्षेत्रपालांनी येथील तहसिलदार यांना यासंदर्भात कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) याबाबत राज्य शासनाच्या वन विभागाने चौकशी करुन दोषीवर कारवाई करणेबाबत कोणता निर्णय घेतला आहे,
(५) नसल्यास, सहयाद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये व इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये बेसुमार वृक्षतोड करणा-यांवर कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) पाटण तालुक्यातील मौजे केमसे या गावातील मालकी गट नं. ४/१ व ३५/४ मधील दोन प्रकरणात सुमारे २ ते २.५ हेक्टर मालकी क्षेत्रावरील ६७६ झाडांची तोड झाली आहे. वन विभागाने अनुसूचित वृक्ष प्रजातीची ३३२ झाडे तोडल्याबाबत तर महसूल विभागाने गैर अनुसूचित वृक्ष प्रजातीची ३४४ झाडे तोडल्याबाबत गुन्ह्यांची नोंद केली आहे.
(२) उपवनसंरक्षक, सातारा यांच्या पूर्व मंजूरीने पाटण तालुक्यातील रासाटी मध्यवर्ती रोपवाटिकेमध्ये हद्दीवरील तारकुंपन करणे, अंतर्गत रोपवाटीका सुधारणा व रोपांच्या वाढीस अडथळा करणारी तसेच अंतर्गत रस्ता करणेकामी जुनी अडथळा होणारी, धोकादायक व परिपक्व झालेली निलगिरी व ॲकेशिया इ. प्रजातीची एकूण १६१ झाडे तोडण्यात आली आहेत.
(३) मौजे केमसे येथील मालकी गट नं. ४/१ मधील ३३ व गट नं. ४/१व ३५/४ मधील ३४४ अवैध वृक्षतोडीबाबत कारवाई करण्याबाबत वन क्षेत्रपाल, पाटण यांनी तहसिलदार, पाटण यांना कळविलेले आहे.
(४) व (५) महाराष्ट्र (वृक्षतोड) अधिनियम, १९६४ व सुधारी १९८९ कलम ३ व ४ नुसार वनक्षेत्रपाल पाटण यांनी मौजे केमसे मालकी गट नं.४/१ व ३५/४ मधील अनुसूचित वृक्ष प्रजातीची ३३२ झाडे तोडल्याबाबत श्री. दत्तात्राय बबन उंद्रे रा. मांजरी खुर्द ता.हवेली, जि.पुणे व इतर २ यांना एकूण रु.१,१५,२००/- रुपये दंड करुन ६३.०० घ.मी. जळावु किटा सरकार जमा करण्यात आला आहे.

तसेच उप विभागीय अधिकारी, पाटण यांनी केमसे गट नं. ४/१, ३५/४ मधील बिगर अनुसूचितील वृक्ष प्रजातींची एकूण ३४४ झाडे विनापरवानगी तोडल्याबद्दल श्री. दत्तात्रय बबन उंद्रे, रा. मांजरी खुर्द, ता. हवेली व इतर २ व्यक्तीना रु. ५९,०२४/- इतका दंड करुन तहसिलदार पाटण यांचेकडे शासकीय खजिन्यात जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

-----------------

### पेठ (जि.नाशिक) तालुक्यातील खडकओहोळ व जुने नाशिकमधील जिल्हा शासकीय रूग्णालयात दोन महिलांचा प्रसुती दरम्यान मृत्यु झाल्याबाबत

**(४७) * ५५४० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.योगेश (बापू) घोलप**

**(देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ (जि.नाशिक) तालुक्यातील खडकओहोळ व जुने नाशिकमधील जिल्हा शासकीय रूग्णालयात दोन ठिकाणी महिला प्रसुतीसाठी दाखल झाल्या असताना त्यांचा उपचारादरम्यान मृत्यु झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ७ महिन्यात २४ मातांच्या मृत्यूंची नोंद झाली असल्याची माहिती निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रसूती दरम्यान होणाऱ्या माता मृत्युंचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधींचा खर्च होत असूनही माता मृत्युचे प्रमाण रोखण्यात शासनास अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कार्यवाही वा उपायायोजना केली आहे काय,

(५) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

जिल्हा रुग्णालय नाशिक येथे दाखल झालेल्या दोन महिलांपैकी एक महिला ८ महिन्यांची व एक महिला २ महिन्यांची गरोदर होती. त्यांचा मृत्यू प्रसुती दरम्यान झाला नसून गरोदरपणात आलेल्या अन्य आजारांमुळे झालेला आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांचेकडील अहवालानुसार सन २०१०-१२ चा मातामृत्यु दर ८७ प्रतिलक्ष जिवंत जन्म इतका होता. आता सन २०११-१३ मध्ये सदरच्या दरामध्ये घट होवून हे प्रमाण ६८ प्रतीलक्ष जिवंत जन्म इतके झालेले आहे. याबाबत शासनामार्फत मातामृत्यू कमी करण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात.

तसेच नाशिक जिल्ह्यामध्येही मातामृत्यू दरामध्ये घट झालेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.